# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**परिपत्रक क्र. आस्था/आरओ/49/२०२०**

**विषय:-** करोना विषाणूचा हेणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत...

**संदर्भ:- १) शासन पत्र क्र. करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५, दि. १४-०३-२०२०**

**२) शासन पत्र क्र. संकीर्ण-२०२०/(संक.क्र.(११४/२०)/विशि-१, दि. १४-०३-२०२०**

**३) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे पत्र क्र.उशिस/ कोरोना/ मवि-१/२०२०/३७७८, दि. १४-०३-२०२०**

उपरोक्त विषयांकीत संदर्भाधिन पत्रांच्या प्रती सोबत जोडलेल्या आहेत. कृपया अवलोकन करावे.

**प्रस्तावना :-**

१) शासनाने करोना विषाणुचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

२) करोना विषाणूचा हेणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालये व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केंद्र यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदीनुसार दि. ३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये सूचित करण्यात आले आहे.

३) तथापि, सर्व महानगरपालिकास, नगरपालिका व नगर पंचायत क्षेत्रातील १० व १२ च्या परीक्षा तसेच विश्वविद्यालयाच्या प्रात्यक्षिके व परीक्षा विहित वेळापत्रकानुसार घेण्यात याव्या असाही निर्णय घेण्यात आला आहे. तसेच आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही, यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्याच्या सूचना संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये देण्यात आल्या आहेत.

४) उपरोक्त सूचना विचारात घेवून उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी/अनुदानित/खाजगी शैक्षणिक संस्था/ महाविद्यालये / अकृषी विद्यापीठे दि. ३१-०३-२०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत सर्व संस्थाप्रमुखांना तात्काळ सूचित करण्याबाबत संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये कळविले आहे.

५) उपरोक्त सूचना विचारात घेवून उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठ, स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे आणि शासकीय / अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित/ मॉडेल डिग्री महाविद्यालये दि. ३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत, विद्यापीठाच्या प्रात्यक्षिके व परीक्षा विहित वेळापत्रकानुसार घेणे, त्याचप्रमाणे आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही, यासाठी आवश्यक ती दक्षता घेणे याबाबतच्या सूचना आपल्या अधिनस्त सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे आणि शासकीय / अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित डिग्री महाविद्यालयांना देण्याच्या सूचना संदर्भिय पत्र क्र. ३ अन्वये देण्यात आल्या आहेत.

**परिपत्रक :-**

या परिपत्रकाव्दारे विद्यापीठातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त सूचना विचारात घेवून विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालये / मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था मधील शैक्षणिक कामकाज दि. ३१-०३-२०२० पर्यंत बंद ठेवण्यात यावे. या कालावधीत विद्यापीठाच्या प्रात्यक्षिक व इतर परीक्षा विहित वेळापत्रकानुसार घेण्यात याव्यात.

त्याचप्रमाणे आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही, यासाठी आवश्यक ती दक्षता घेण्यात यावी.

सदर कालावधीत विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये / मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था मधील तसेच विद्यापीठातील सर्व शैक्षणिक / प्रशासकीय विभागातील प्रशासकीय व इतर कामकाज नियमित सुरु राहील.

विद्यापीठ प्रांगण, )(
औरंगाबाद- ४३१ ००४ )(
संदर्भ :- आस्था/आरओ/२०२०/9096-183 )( डॉ/ कुलसचिव 14/3/2020
दिनांक :- १४-०३-२०२० 15 )(

**या परिपत्रकाची प्रत माहिती व पुढिल कार्यवाहीस्तव :-**

१. मा. संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसर, उस्मानाबाद.
२. सर्व शैक्षणिक विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
३. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
४. मा. प्राचार्य/संचालक, विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्था
५. संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदरील परिपत्रक व भित्तीपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.
६. जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.